# महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ

(शासनाचा सार्वजनिक उपक्रम)

**विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.**

प्लॉट नं. ब-२६, एम.आय.डि.सी. एरिया, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर - ४३१००५.

फोन/फॅक्स -०२४०-२३३३८११,टोल फ्री नं - १८००१२१८०६६ इमेल-aurangabad.ro@mswc.in


## निविदा (Short Tender Notice)

**महामंडळाचे जांबरगाव, ता. वैजापूर येथील पेट्रोल पंप भाड्याने देणेबाबत.**

**स्वारस्य अभिव्यक्ती (EOI)**

हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गालगत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात विकसित करण्यात आलेल्या जांबरगाव, ता. वैजापूर जि. छत्रपती संभाजीनगर येथील महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे जांबरगाव (ॲग्रो लॉजिस्टिक पार्क) येथील गट नं. २४५ मधील ९.३८ हेक्टर आर क्षेत्रामध्ये २/६००० मे. टन क्षमतेचे गोदामे, १०,००० मे. टन क्षमतेचे सायलो, पेट्रोल पंप (HPCL), क्लिनिंग ग्रेडिंग यार्ड (C&G Machine), सामाईक सुविधा केंद्र (CFC Building), शेतकरी निवास, प्रयोगशाळा, वजनकाटा, उपहार गृह, ट्रक टर्मिनल इत्यादी सुविधा निर्माण केल्या आहेत. **त्यामधील महामंडळाचा HPCL या कंपनीचा पेट्रोल पंप कमीत कमी प्रती महा भाडे रु.२,००,००० + GST या भाडे तत्वावर प्रती वर्षी ५% दरवाढीने किमान पाच वर्ष (२+३) कालावधीसाठी देण्याचे नियोजन आहे**. महामंडळाकडे यशस्वी निविदाकाराने (H-१) रु.५० लाख विना व्याज सुरक्षा तारण ठेव रक्कम ठेवावी लागेल. त्यासाठी सदर पेट्रोल पंप भाडे तत्वावर घेणेबाबत शेतकरी, व्यापारी, शेतकरी उत्पादक कंपनी, व्यापारी संस्था / कंपन्या इ. आर्थिक दृष्ट्या सक्षम आणि पेट्रोल पंप चालविण्याचा कमीत कमी एक वर्षाचा अनुभव असणाऱ्या इच्छुक निविदाकारांकडून लिफाफा पद्धतीने सिलबंद निविदा/दरपत्रके मागविण्यात येत आहे. जास्तीत जास्त दर नमूद करणारी निविदा / दरपत्रक मान्य करण्यात येईल.

| वखार केंद्राचे नाव | सुविधा | संपूर्ण पत्ता |
|---|---|---|
| जांबरगाव | पेट्रोल पंप HPCL (एकुण ६ नोजल व ३५,००० कि.लि. डिझेल तर १६,००० कि. लि. पेट्रोल टाकीची साठवणूक क्षमता आहे.) | गट नं-२४५, वैजापूर गंगापूर रोड, जांबरगाव, ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर-४२३ ७०१ |

तरी इच्छुक निविदाकारांनी निविदा दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात विभागीय कार्यालय, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, प्लॅाट नं.ब-२६, एम.आय.डि.सी. एरिया, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर-४३१००५ या पत्यावर कार्यालयात दिनांक २३/०५/२०२५ ते दिनांक ०६/०६/२०२५ या कालावधीत सायंकाळी ४:०० वाजेपर्यंत. (सुट्टीचे दिवस सोडून) पोहोच होतील अश्याबेताने पाठवाव्यात किंवा स्वतःप्रत्यक्ष पोहच कराव्यात. सदर बंद लिफाफ्यामध्ये इच्छुक निविदाकारांनी त्यांचे आर्थिक उलाढाली बाबत मागील तीन वर्षाचा Audited Report आणि IT return तसेच GST नोंदणी प्रमाणपत्र आणि पेट्रोल पंप चालविण्याबाबतचे किमान १ वर्ष अनुभव असल्याचे प्रमाणपत्र इ. आवश्यक कागदपत्रे सोबत जोडावीत. प्राप्त निविदा /दरपत्रके विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या कार्यालयात दिनांक ०६/०६/२०२५ रोजी सांयकाळी ०५:०० वाजता उघडण्यात येतील. निविदाकार किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी निविदा उघडण्याच्या वेळी उपस्थित राहू शकतात. तसेच सदर पेट्रोल पंप सुविधा भाडे तत्वावर देण्यासाठीचा अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार महामंडळाचे मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्याकडे राहील याची नोंद घ्यावी. निविदाकाराला महामंडळाच्या अटी / शर्ती लागू राहतील.

निविदेकरिता अटी व शर्ती महामंडळाच्या www.mswarehousing.com या संकेतस्थळावर पाहता येईल.

**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**

**महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ,**

(शासनाचा सार्वजनिक उपक्रम)


**पत्ता :**-विभागीय कार्यालय,महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ,

प्लॅाट नं. ब-२६, एम.आय.डि.सी. एरिया, स्टेशन रोड,छत्रपती संभाजीनगर - ४३१००५.

ई-मेल :- aurangabad.ro@mswc.in मो. न.: - ९५५२६७२३००, ८८८८०७०२९७, ९९७०६३३९७१.

**<u>महामंडळाचे जांबरगाव, ता. वैजापूर येथील पेट्रोल पंप भाड्याने देणेबाबत निविदे मधील अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहेत.</u>**

- पेट्रोल पंप भाडे तत्वावर चालविण्यासाठीचा कालावधी ५ वर्ष (lock in period आरक्षण कालावधी २ वर्ष (२+३)).
- सदर पेट्रोल पंपाचा कराराचा कालावधी प्रथम २ वर्ष नंतर ३ वर्षाचा राहील, सदर मुदतीत करारचा कोणत्याही अटी व शर्तीचा भंग न केल्यास करार वाढविण्याचा अधिकार महामंडळास राहील.
- सदर मासिक भाड्याच्या रक्कमेत प्रति वर्षी ५% दर वाढ करण्यात येईल.
- निविदाधारकास महामंडळाकडे ५० लाख विनाव्याज सुरक्षा तारण ठेव (Security Deposit) रक्कम D.D./ RTGS द्वारे जमा करणे बंधनकारक राहील.
- पेट्रोल पंपाचा व इमारतीचा तसेच तद अनुषंगिक विमे निविदाधारकास काढावा लागेल.
- पेट्रोल पंपावरील मनुष्यबळांचा सर्व खर्च निविदाधारकास करावा लागेल.
- पंप चालविण्यासाठी सेवा प्रदात्याने पंपावर नेमलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतनाची अदायगी करण्याची व याबाबत कामगार कायदे व वैधानिक आवश्यकता याचे पालन न केल्यास त्याची जबाबदारी सेवा प्रदात्याची राहील.
- प्रत्येक दिवशी पंपावर होणारे व्यवहारांच्या नोंदी हे पेट्रोलियम मंत्रालयाने पारित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे योग्य व अचूक पध्दतीने ठेवावी लागेल.
- पंप चालविण्यासाठी लागणारी साधने व उपकरणे, वीज व पाणी बिल व इतर खर्च सेवा प्रदात्याला करावे लागतील.
- सेवा प्रदात्याने पंपावर हवा, पाणी व इतर ग्राहकाभिमुख सुविधा प्रभावीपणे चालवण्यासाठी व्यवस्था करावी लागेल.
- सेवा प्रदात्याने स्टॅपिंग करुन घेण्यासाठी Weights & Measurement विभागाला स्टॅपिगसाठी लागणारी रक्कम अदा करावी लागेल.
- पंपाच्या जागेमधून अनधिकृत वहीवाट व अतिक्रमण होणार नाहीत याची दक्षता सेवा प्रदात्याने घ्यावी. उत्पादन प्राप्त करून घेताना व त्याचे वितरण करताना पंपाच्या परिसराची सर्व बाबतची काळजी घेण्याची जबाबदारी ही सेवा प्रदात्याची राहील. अशी ऑपरेशन सुरू असताना त्यावेळी निष्काळजीपणा आढळून आल्यास होणारे नुकसान सेवा प्रदात्याला सहन करावे लागेल. यास महामंडळ जबाबदार राहणार नाही.

- करारनाम्यात नमूद दराने महिन्याला १० तारखेपर्यंत भाडे रक्कम महामंडळाच्या खात्यावर जमा करणे बंधनकारक राहील.
- कामगार कामावर असतांना त्यांचे संरक्षणाकरिता सेफ्टी वस्तूंचा वापर करणे प्रदात्यास बंधनकारक राहील. भविष्यकाळात कोणतीही दुर्घटना झाल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी प्रदात्याची राहील.
- निविदाधारकास अटी व शर्तीप्रमाणे ताब्यात दिलेल्या पेट्रोल पंपावरील इमरती व इतर वस्तूंची काळजी घ्यावी लागेल, पेट्रोल पंप चालविण्यासाठी मुदत संपल्यानंतर ताब्यात देतांना जशी होते तशी ताब्यात द्यावी लागेल.
- पेट्रोल पंपाचा करारनामा रद्द करावयाचा असल्यास २ वर्षांचा Lock in period संपल्यानंतर, ठेवीदाराकडून ३ महिने आधी नोटीस दिली जाईल किंवा वखार महामंडळास पेट्रोल पंपाची आवश्यकता भासल्यास महामंडळाकडून कंपनीला १ महिना आधी नोटीस दिली जाईल.
- पेट्रोल पंपाच्या व्यवसायात किंवा इतर कोणत्याही कारणामुळे प्रदात्यास तोटा झाल्यास महामंडळ जबाबदार राहणार नाही.
- पेट्रोल पंप परिसरात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी प्रदात्याची राहील. तसेच सदर परिसरात घाण होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल.
- पेट्रोल पंपाबाबत आरक्षण मंजूर कालावधीकरिता नोंदणीकृत करारनामा करावा व करारनामा नोंदणीचा व मुद्रांक शुल्काचा व त्या अनुषंगिक बाबीचा सर्व खर्च सदर प्रदात्याने करावा लागेल.
- महामंडळाच्या पेट्रोल पंपा संदर्भातील अटी व शर्ती प्रदात्यास मान्य असल्याबाबतचे Acceptance letter महामंडळास सादर करावे लागेल.
- प्रदात्याने व्यवसायासाठी लागणाऱ्या प्राथमिक तसेच आवश्यक सोयी जसे स्वच्छतागृह, पाणी, वीज, पाण्याची टाकी, फायर फायटींग पंप, सॅन्ड बकेट इत्यादी ठेवीदाराने स्वतःच्या खर्चाने उपलब्ध करुन घ्यावयाच्या आहेत. त्या आवश्यक सोयी उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या महामंडळाने द्यावयाच्या आहेत.
- विद्युत पुरवठा तसेच शासकीय परवाने / परवानग्या घेण्याची जबाबदारी संबंधीत प्रदात्याची राहील. त्यासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या महामंडळाने द्यावयाच्या आहेत.
- एकुण भाडे देयकावर TDS १०% कपात करुन प्रमाणपत्र संबंधित केंद्र प्रमुख, जांबरगाव यांचेकडे सादर करावे.
- दरपत्रक सादर करण्यात येणाऱ्या बंद लिफाफ्यामध्ये इच्छुक निविदाकारांनी त्यांचे आर्थिक उलाढाली बाबत मागील तीन वर्षाचा Audited Report आणि IT return तसेच GST नोंदणी प्रमाणपत्र व पेट्रोल पंप चालविण्याबाबतचे किमान एक वर्ष अनुभव असल्याचे प्रमाणपत्र इ. आवश्यक कागदपत्रे सोबत जोडावीत.
- पेट्रोल पंपाचे कामकाज कार्यालयीन मार्गदर्शिका (SOP) नुसार करणे बंधनकारक आहे.
- वरील अटी व शर्ती मान्य असल्याचे निविदाकारांने दरपत्रकासोबत हमीपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

----------------